# यशोगाथा खंडाळा

## जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा खंडाळा

पं. स. तेल्हारा जि. प. अकोला

**U Dise 27050702401**



क्रमांक ६, श्रीरामपूर' या शाळेची सन्२०१८-१९या शैक्षणिक वर्षात राबवलेल्या उपक्रमांमुळे निवड करण्यात आली दि.२१.०९.२०१९ रोजी आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त व प्रदान करण्यात आला

**शाळा भेटी**

शाळा व्यवस्थापन समिती सन्माननीय आधिकारी पदाधिकारी माझे शिक्षक महानगरपालिका अहमदनगर प्रशासनाधिकारी श्री सुभाष पवार साहेब श्रीरामपूर तालुक्याचे प्रांतसाहेब श्री अनिल पवार, डायट प्राचार्या श्रीम. जडे मॅडम व टीम पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सूर्यवंशी साहेब विस्ताराधिकारी दिवे साहेब श्रीरामपूर नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी माननीय श्री पठारे साहेब शाळा भेट

**शैक्षणिक उठाव**

संगणक सेट- मान. माजी आमदार श्री. भाऊसाहेब कांबळे, श्रीरामपूर.

बी. टी. स्पीकर व दोन माइक सेट - सासवडकर कुटुंबीय.

गरजू व लांबून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सायकल वाटप - श्रीम. यास्मिन शेख.

**शालेय दप्तर वाटप - युवा काँग्रेस**

या सर्वांची फलश्रुती म्हणजेच प्रभू रामचंद्रांच्या पावन भूमीमध्ये श्रीरामपूर तालुक्यातील नगरपालिका शिक्षण मंडळाची नगरपालिका शाळा क्रमांक ६, ही फक्त तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात नावलौकिकास आली आहे. सप्टेंबर २०१९ मध्ये शाळेला मान. अकोलकर नवनाथ सखाहरी हे ग्रेडप्राप्त मुख्याध्यापक मिळाले आणि शाळेचा कायापालट झाला. शाळेचे अंतर्बाह्य रूप बदलून गेले .वाढती पटसंख्या व नाविन्यपूर्ण उपक्रम यांनी शाळेला विशेष ओळख निर्माण करून दिली. इतर शाळेत केलेली मुले पुन्हा शाळेत येऊ लागली, इंग्रजी माध्यमातील मुले ही शाळेत प्रवेश घेण्यास तयार झाली. हे सर्व काही प्रशालेचे मुख्याध्यापक यांनी आपल्या शाळेतील सर्व शिक्षकांना विश्वासाने एकत्रितपणे सहभागी करून घेऊन सर्वजण आत्मीयतेने शाळेच्या प्रगतीसाठी अविरत मेहनत घेत असल्याने शक्य झाले.नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन

अधिकारी मान.श्री पटारे साहेब यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते.




## जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्रशाळा खंडाळा ता.तेल्हारा.जि.अकोला

***शिक्षणाचा लळा लावणारी जि.प. खंडाळा शाळा***

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव,भावविश्वाला सन्मान नि मनामनात सामाजिक जाणिवांची पेरणी या हेतूने कार्यप्रवण असणारी अकोला जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेली तेल्हारा तालुक्यातील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्रशाळा खंडाळा. विद्यार्थी हा भविष्यात आदर्श समाज व्यवस्थेचा घटक व्हावा अशा विचारांनी The Future begins here.... हे घोषवाक्य जगणारी नि अनुरूप कामकाज करणारी ही उपक्रमशील शाळा.प्रत्येक अध्ययनार्थी ला शिक्षणाचा लळा लावणारी शाळा बनली आहे.




सातपुडा पर्वत रांगांची हिरवाई शाळेच्या मैदानातून नेहमी नजरेला पडते.शाळेला चौफेर घेर असणारी आंबा,लिंबू,रामफळ,सिताफळ, अशोक ,बोगनवेल अशी फुल वेली व झाडे आपल्या हिरवाईने मन आकर्षित करतात.आवार भितीची रंगरंगोटी व वर्ग खोल्यांच्या भिंती वरील आकर्षक बोलणारी चित्रे आलेल्या सर्वांना शाळेच्या आवारात जाताच आपलेसे करुन बोलतं करतात.

माझे गाव माझी शाळा असं गावातल्या प्रत्येक नागरिकाला वाटते म्हणून प्रत्येक शालेय सहशालेय उपक्रमात येथील नागरिक आनंदाने सहभागी होतात. त्याला पूर्व इतिहास सुद्धा कारणीभूत आहे येथील दानशूर व्यक्तिमत्व श्री.रावजी धूळ यांनी शाळेला 8 एकर शेती दान दिली.ज्यातून शाळेची रंगरंगोटी व इतर लागणाऱ्या सुविधांची पूर्ती केली जाते. तर दानशूर व्यक्तिमत्व संतोष गाडोदिया यांनी गावातील विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक आवड निर्माण व्हावी म्हणून मैदानासाठी जागा दान दिली. सध्या सुद्धा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग शाळांना आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता करण्यासाठी नेहमीच मदतीचा हात पुढे करतात.

शाळा व्यवस्थापन समिती व सर्व शिक्षक वृंद यांच्या प्रयत्नातून शालेय गुणवत्ता विकास, भौतिक सुविधांचा विकास करण्यासाठी प्रयत्न केल्या जातात.सत्र प्रारंभीच उपक्रमाचे नियोजन केल्या जाते. मुख्याध्यापक सौ शीला विनोद टेंभरे ,अध्यापक श्रीकृष्ण

वाकोडे ,ओमप्रकाश निमकडे, राजेंद्र दिवनाले, निखिल गिन्हे,सुरेखा हागे,गोपाल मोहे, तुलसीदास खिरोडकार हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध उपक्रमांची आखणी करतात.सातत्याने अंमलबजावणी व त्रुटींवर उपाययोजना आखत नियमित अध्ययन कार्यासोबतच शालेय व सहशालेय उपक्रम राबविल्या जातात.

**शाळेत राबविल्या जात असलेले उल्लेखनीय उपक्रम**

**शाळाबाह्य मुलांना प्रवेश**

गावची लोकसंख्या सुमारे २५०० असून खंडाळा ग्रामस्थांसोबतच शेजारील गावातील आदिवासी समाज शाळेसोबत जुळलेला आहे. सातपुडा पर्वतरांगांमध्ये अधिवास करणाऱ्या कोरकू,भिल्ल जमातीची असंख्य कुटुंबे स्थलांतरित होऊन रोजगारासाठी या भागात येतात.शेत शिवारात राहणाऱ्या स्थलांतरित कुटुंबाच्या भेटी घेऊन तेथील बालकांना वयानुरूप शाळेत प्रवेश दिला जातो. मागील सत्रात १४ विद्यार्थ्यांना शोध घेऊन शाळा प्रवेशित करण्यात आले.अशा मुलांच्या वैयक्तिक गरजा, कपडे ,शैक्षणिक साहित्य ,घरी लागणारा आहार, आरोग्य सुविधा ह्याची पूर्तता शाळेतील शिक्षक गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या माध्यमातून पूर्ण केल्या जाते.म्हणून ही सर्व मुले सातत्याने शालेय प्रवाहात टिकवून ठेवता आली.

**बोलीभाषा पुस्तक निर्मिती**

परीसरातील अनेक कोरकू बोलीभाषिक मुले शाळेत दाखल होतात. या मुलांची प्रमाण भाषेची ओळख फार कमी असल्यामुळे शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया प्रभावी ठरत नव्हती. या मुलांच्या अध्ययन प्रक्रियेत गतिमानता यावी म्हणून शाळेतील शिक्षक तुलसीदास खिरोडकार यांनी आपल्या कोरकू बोलीभाषिक शाळांमधील सेवेच्या स्वानुभवातून बालस्नेही कोरकू - मराठी भाषा ओळख या पुस्तिकेची निर्मिती केली. त्यामुळे कोरकू बोलीभाषिक विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकायला सहजता आली व शिक्षकांना सुद्धा विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करताना सोयीचे झाले.

**डॉ.एपीजे अब्दुल कलाम बाल वाचनालय**

शाळेचे ग्रंथालय हे पुस्तकांनी समृद्ध असून लोकसहभागातून भेट रूपात अनेक पुस्तके वाचनालयाला दान मिळाली आहेत.विद्यार्थी आवडीने पुस्तकं वाचतात या वाचनाच्या सवयीमुळे ते लिहायला लागले आहेत.किशोर मासिकात शब्दकोडे,स्वतःचे अनुभव दरमहा विद्यार्थी लिहून पाठवतात. दै. सकाळ वृत्तपत्राच्या बालमित्र साप्ताहिक पुरवणीत चित्र, कथालेखन करून विद्यार्थी सहभाग घेतात.विद्यार्थ्यांमध्ये झालेला हा बदल वाचनालयाच्या उपक्रमामुळे शक्य झाला.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

शिष्यवृत्ती व नवोदय या स्पर्धा परीक्षाचे मार्गदर्शन दररोज शाळा संपल्यानंतर विषय निहाय घेतले जाते. नियमित मार्गदर्शन होत असल्यामुळे गतवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत चार विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. गावातील उच्चशिक्षित तरुण-तरुणी शाळेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

**उखाणा हस्तलिखित निर्मिती**

माता पालकांचा शाळेशी संपर्क वाढावा, पाल्याच्या शिक्षणाची अध्ययन स्थिती घरोघरी समजावी म्हणून दर दोन महिन्यांनी माता पालक मेळावा आयोजित केल्या जातो. विविध स्पर्धा , खेळ, उखाणा लेखन, बालपणीच्या गप्पाटप्पा यासोबतच पाल्यांच्या प्रगती व उणिवा बाबत चर्चा करण्यात येते. या उपक्रमाने माता पालकांना शाळेबद्दल आस्था निर्माण झाली तसेच स्त्रियांच्या आवडीचा उखाणा हा काव्यप्रकार हस्तलिखित स्वरूपात संकलित करण्यात आल्याने भाषिक समृद्धीसाठी हा उपक्रम सहाय्यभूत ठरला आहे.



**लेखक आपल्या भेटीला**

पाठ्यपुस्तकातील कविता ,पाठ्यांश लिहिणारे कवी,लेखक,यांना व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विद्यार्थ्यांच्या भेटीला निमंत्रित केल्या जाते. परिसरातील काही ज्येष्ठ साहित्यिक कवी त्यांच्याशी विद्यार्थी गप्पा करून साहित्याची निर्मिती कशी होते हे जाणून घेतात. स्वाध्याय बाबत चर्चा केल्या जाते.प्रत्यक्ष लेखक-कवी यांच्याशी संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्तुंग आत्मविश्वास या उपक्रमामुळे निर्माण झाला. साहित्य वाचनानंद व जगणे विद्यार्थ्यांना लेखकांशी संवाद साधून समजले.तसेच शिक्षक किंवा विद्यार्थ्यांचे पालक पर्यटनासाठी वा शासकीय कार्यालयात कामानिमित्त गेले असता तेथील कामकाज तसेच भेट दिलेल्या स्थळाची भौगोलिक,ऐतिहासिक माहिती वर्गातील टिव्ही वर करुन करून दिल्या जाते.या उपक्रमामुळे व्हर्च्युअल क्लासरूम ची अनुभूती विद्यार्थ्यांना होत आहे.बाहेर ना जाता शाळेत बसल्याबसल्या विविध ठिकाणांची माहिती सहज उपलब्ध होत असल्याने गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले.

**बाल हक्क संरक्षण**

स्त्रियांवर ,बालकांवर होणारे वाढते अन्याय-अत्याचार थांबावे. मुलींना शारीरिक वाढ,स्वसंरक्षण,गुड टच बॅड टच याबाबत बालवयातच कळावे म्हणून दरवर्षी माता पालक व विद्यार्थिनी यांची सयुक्त बाल हक्क संरक्षण कार्यशाळा घेण्यात येते. उपलब्ध शासकीय सुविधा तसेच कायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. शिक्षक व माता पालक एकत्रित आल्यामुळे गावात बाल हक्काचे संरक्षण होत आहे. यामुळे मुलींमध्ये स्वसंरक्षणासोबतच कायद्याबाबत जागरूकता निर्माण झाली आहे.

**ऑनलाइन होमवर्क**

संपूर्ण शाळा डिजिटल असून प्रोजेक्टर, स्मार्ट टीव्ही, टॅबलेट व स्मार्टफोनचा वापर शाळेत नियमित केला जातो.पालकाचे व्हाट्सअप ग्रुप वर्गनिहाय करण्यात आलेले आहेत.ऑनलाईन होमवर्क, सूचना, त्यांची प्रगती, उणिवा, विद्यार्थी सहभागाचे फोटो,ऑडिओ,व्हिडिओ समाज माध्यमावर शेअर केल्या जातात. विद्यार्थ्यांच्या चांगल्या कृतीचे जाहीर अभिनंदन केले जाते. यामुळे

शाळा सुटल्यानंतर सुद्धा विद्यार्थी शिक्षकांच्या संपर्कात असतो.अशाप्रकारे तंत्रज्ञान वापरून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत पालकांना माहिती देण्यात येते.

**कोरोना जनजागृती कार्यशाळा**

जगातील चीन,अमेरिका या देशांमध्ये कोरोना व्हायरस हाहाकार माजवत असताना,भारतात उग्ररूप धारण करण्यापूर्वी शाळेमध्ये कोरोना जनजागृती कार्यशाळा घेऊन गावातील नागरिकांना कोरोना विषाणू- कोविड19 आजाराबाबत जागृत केले. या उपक्रमामुळे अगोदरच सतर्कतेची सूचना मिळाल्यामुळे लॉकडाऊन च्या काळात विद्यार्थी व पालकांनी सहजपणे शासनस्तरावरून आलेल्या सूचनांचे पालन केले.नियमित मास्क व हातांची साबनाने स्वच्छता,वैयक्तिक स्वच्छता,परिसर स्वच्छता याकडे गावकरी जाणीवपूर्वक लक्ष देऊ लागले.

**हॅन्ड वॉश स्टेशन**

स्वच्छता विषयक सवयी विद्यार्थ्यांना लागाव्यात या उद्देशाने शाळेत चार ठिकाणी हॅन्ड वॉश स्टेशन तयार करण्यात आलेले आहेत.जेवणापुर्वी वा इतर कामानंतर साबणाने हात नियमित स्वच्छ धुतात.यामुळे विद्यार्थ्यांच्या लहान-मोठ्या आजाराच्या समस्या सहज सुटल्या आहेत.

**मोहल्ला शाळा**

कोविड १९ महामारीच्या काळात गावातील घरांच्या भिंतीवर अध्ययन पूरक पाठ्यक्रम लिहून वाचन लेखन करण्यासाठी उपलब्ध केल्या.तसेच योग्य अंतर ठेऊन मोहल्ल्यातील कमाल १० विद्यार्थ्याला एकत्रित करून ऑफलाईन मोहल्ला शाळा उपक्रम शिक्षकांनी पालकाच्या सहकार्याने सुरु केला.

**रेडिओ खंडाळा वाहिनी**

शाळेच्या वतीने तंत्रज्ञान वापरून रेडिओ खंडाळा ही शैक्षणिक वाहिनी कोविड १९ या महामारीच्या काळात अध्यापक तुलसीदास खिरोडकार यांनी सुरू केली. निवेदक व अतिथी संपादक म्हणून अकोला जिल्ह्यातील मीनल अरुणराव देशमुख (बाभुळगाव जहागीर), शुभांगी साहेबराव गीते(आंबोळा), शुभांगी जयसिंगराव सरनाईक (करोडी ) अपर्णा राजेश आम्ले(भीली), सविता शेषराव खिल्लारे (म्हैसांग),प्रवीण मुरलीधर चिंचोळकर (तळेगाव खुर्द),प्रतिभा राजेंद्र पाटोळे (दहीगाव गावंडे ),सुरेखा ब्रह्मदेव हागे( खंडाळा), कांचन धनराज घटाळे(पातोंडा), ओमप्रकाश पुरणमल उगले (गोर्धा),प्रतिज्ञा आपोतीकर (जऊळका) ह्या उपक्रमशील गुरुजनानी जबाबदारी घेतली आहे. यांच्या सहयोगाने राज्यभरातील विद्यार्थ्यांना अध्ययन पूरक कार्यक्रम नियमीत प्रसारित करण्यात येत आहेत.ज्याचे आतापर्यंत १०००चे वर शैक्षणिक भाग प्रसारित झाले.

अशा या विविध उपक्रमासोबतच विद्यार्थी - शिक्षक वाढदिवस उपक्रमांतर्गत वृक्षभेट,बालआनंद मेळावा ,परिसर क्षेत्र भेट- जलशुद्धीकरण केंद्र, इंग्रज-मराठा युद्ध भूमी सिरसोली भेट,माझी कलाकृती उपक्रम, स्वच्छता पंधरवाडा, क्रीडामहोत्सव , सांस्कृतिक कार्यक्रम, अशा विविध उपक्रमाचे आयोजन केल्या जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिन विकास करण्यात येतो.प्रत्येक मूल आपले भावविश्व विस्तारण्यासाठी अशा उपक्रमात मनःपूर्वक सहभाग घेते.

येथील विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत त्यामुळे सहजतेने अध्ययन होत आहे. चवदार, रुचकर शालेय पोषण आहार नियमित शिजवल्या जातो ज्याची दखल दूरदर्शन सह्याद्री वाहिनी ने घेतली आहे. सोबतच डिजिटल शाळा , ई लर्निंग सुविधा ,सहशालेय उपक्रम अंमलबजावणी , शाळा सिद्धी अ श्रेणी,ट्युनिंग शाळा उपक्रम ,आनंददायी शिक्षण,तंबाखूमुक्त शाळा असल्याने पालक वर्ग शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतात.

गावातील प्रत्येक मुलाने दर्जेदार शिक्षण घ्यावे यासाठी शिक्षकांना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शैला युवराज खंडेराव, उपाध्यक्ष प्रशांत अंबुसकर यांच्या प्रेरक मार्गदर्शनातून सौ.लक्ष्मी दिनकर धूळ, संतोष गोविंद वैतकार, जितेंद्र तुकाराम पाटोळे, नरेश यशवंत पिलात्रे, ज्योती प्रमोद धुये,सौ.मालुताई संतोष मोरे,सौ.नंदा गजानन परमाळे, किशोर राधेश्याम मुंदडा, दिनकर शंकर धूळ हे सर्व सदस्यगण मनःपूर्वक सहकार्य करीत असतात.

विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता विकास करण्यासाठी शालेय स्तरावरून प्रयत्न करण्यात येत आहेत.शासकीय योजनांचा लाभार्थींना लाभ देणे,पालकांचा जास्तीत जास्त सहभाग शालेय कामकाजात घेतल्या जात असल्यामुळे परिसरातली उत्कृष्ट शिक्षण संकुल म्हणून अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा खंडाळा नावारूपास आली आहे.

लेखन
तुलसीदास किसनराव खिरोडकार
डिजिटल दैनिक रयतेचा वाली,अकोला जिल्हा प्रतिनिधी






दैनिक रयतेचा वाली या ऑनलाईन वृत्तपत्रात शाळेची यशोगाथा प्रसिद्ध.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी रंगभरण व सामान्य ज्ञान स्पर्धा जि. प. शाळा खंडाळा येथे **19** फेब्रुवारी **2022** रोजी घेण्यात आली.






खंडाळा शाळेचा उपक्रम : आठवड्यातून दोन दिवस मोहल्ला शाळा

# विद्यार्थ्यांस शिकण्यासाठी मोहल्ला शाळेचा पर्याय

कोरोना काळात प्रत्यक्ष शाळा घेणे शक्य नव्हते अशावेळी गावामध्ये पाच ते सहा विद्यार्थ्यांचा गटामध्ये अभ्यास व्हावा यादृष्टीने मोहल्ला शाळा हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामध्ये शाळेतील शिक्षक व गावामधील शिक्षण मित्र त्यांनी विद्यार्थ्यांचा

अभ्यास करून घेतला सोशल डिस्टंसिंगचे पालन करून सदर उपक्रम राबवण्यात आला.




घराच्या भिंतींवर पाढे, शब्द, वाक्ये लिहून भिंती रंगवण्यात आल्या. या बोलक्या भिंतींचा उपयोग विद्यार्थ्यांना वाचनासाठी झाला. कोरोना काळात यामुळे गावातील सर्व मुलांना वाचण्यासाठी अध्ययन

साहित्य मिळाले. या उपक्रमासाठी गावातील नागरिकांनी भिंतींवर लिहिण्यासाठी सहकार्य केले.

लोकमत

संडे अँकर । 'आईच्या शाळे'त मातांचा निर्णय; बाल हक्क, संरक्षण कार्यशाळा

# आम्ही सांगणार मुला-मुलींना 'गूड टच-बॅड टच'!

**लघुपट पाहताना महिला पालक भावुक!**

आईच्या शाळेत 'कोमल' हा लघुपट पालकांना दाखविण्यात आला. लघुपट पाहताना महिला पालक भावुक झाल्या. लघुपटाने कुटुंबात बालक बालिका सोबत संवाद साधण्यासोबतच चाइल्ड लाइनची कार्यपद्धती व १०९८ क्रमांकाचा वापर करण्यावर भर देण्यात आला.

लोकमत न्यूज नेटवर्क

खंडाळा : मुले, मुली, महिला आणि युवतींवर लैंगिक अत्याचाराच्या, छेडखानीच्या वाढत्या घटना चिंतेचा विषय बनल्या आहेत. या विकृतीला प्रतिबंध घालण्यासाठी कुटुंबातील मुला-मुलींना गूड टच-बॅड टचबाबत आम्ही माहिती सांगणार, असा निर्णय जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा खंडाळा येथे आयोजित आईच्या शाळेत माता पालकांनी घेतला.



आईची शाळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैला खंडेराव होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच मीरा वैतकार, मुख्याध्यापक शीला टेंभरे, लक्ष्मीताई धूळ, ज्येष्ठ शिक्षक श्रीकृष्ण वाकोडे, सेव्ह बचपनचे जिल्हा समन्वयक तुलसीदास खिरोडकार उपस्थित होते.

कुटुंबातील लेकरांसोबतच इतर सर्व मुला-मुलींचे संरक्षण करणे, त्यांच्यावर संस्कार करणे व राज्यघटनेने दिलेले हक्क त्यांना मिळवून देण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. चाइल्ड लाइन १०९८, बाल हक्क कायदे, बाल अत्याचाराबाबत शिक्षेची तरतूद याची माहिती कार्यशाळेत देण्यात आली. तसेच प्रत्येक आई-वडिलांनी मुला-मुलींसोबत मोकळेपणाने वयानुरुप शारीरिक, मानसिक बदलाबाबतची चर्चा घरोघरी करुन आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यास पुढाकार घेण्याचे आवाहन सेव्ह बचपनचे जिल्हा समन्वयक तुलसीदास खिरोडकार यांनी केले.

यावेळी 'कोमल' हा लघुपट उपस्थित माता पालकांना दाखवून समाजातील वाईट विचारसरणीचा अंत करण्याविषयी चर्चा करण्यात आली. आईच्या शाळेत बहुसंख्य माता पालकांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला. चर्चासत्रानंतर शाळेच्या वतीने मातांसाठी रस्सीखेच तसेच संगीत खुर्ची या आनंददायी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळा यशस्वीतेसाठी ओमप्रकाश निमकर्डे, राजेंद्र दिवनाले, निखिल गिन्हे यांनी प्रयत्न केले. संचालन सुरेखा ह्लागे यांनी केले, तर आभार गोपाल मोहे यांनी मानले.

Hello Akola Gramin
Page No. 3 Mar 08, 2020
Powered by: erelego.com

जागतिक महिला दिनानिमित्त **8** मार्च **2020** रोजी

जि. प. शाळा खंडाळा येथे आईची शाळा उपक्रमात गुड टच बॅड टच याविषयी जनजागृती करण्यात आली.



**दिव्य मराठी विशेष** • खंडाळा येथील जि.प. शाळेचे शिक्षक तुलसीदास खिरोडकार यांचा उपक्रम

# शिक्षकाने विद्यार्थ्यांसाठी सुरू केली रेडिओ वाहिनी

प्रतिनिधी ।हिवरखेड

सध्या कोरोनामुळे आगामी काळातही लवकर शाळा सुरू होण्याची चिन्हे दिसत नाहीत. मात्र, या परिस्थितीपुढे हात न टेकता तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड जवळील खंडाळा जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षक तुलसीदास खिरोडकार यांनी रेडिओ खंडाळा वाहिनी सुरू केली. यात पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गानुसार मोबाइलवर लिंक पाठविण्यात येते. ती लिंक ओपन केल्यावर विद्यार्थ्याला दररोजचा अभ्यासक्रम सोबतच बोधकथा, पाठ्यपुस्तकातील कविता गायन, उतारा वाचन ऐकवण्यात येतात.

खंडाळा रेडिओवरून विविध विषयांवर प्रवीण चिंचोळकर, ओमप्रकाश उगले, विनोद बोचे, साधना पाटील, मनिषा शेजोळे, वंदना मांगटे, गजानन काळबांडे, गोपाल गिऱ्हे, संतोष वालचाळे, संदीप भड हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करीत आहेत. अभ्यासक्रमातील कुठल्याही भागाला रंजक करण्याचा त्यांचा पुरेपूर प्रयत्न असतो. त्यामुळे कमी काळातच राज्यभर या लिंक प्रसारित होत आहेत. जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा खंडाळा येथील केंद्रप्रमुख गजानन गायगोळ, मुख्याध्यापक शीला टेंभरे, ओमप्रकाश निमकर्डे, श्रीकृष्ण वाकोडे, सुरेखा हागे, राजेंद्र दिवनाले, गोपाल मोहे, निखिल गिऱ्हे यांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जात आहे. रेडिओच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर करत अँकर एप्लीकेशन वापरून विद्यार्थ्यांना वेगळ्या पद्धतीने शिकवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

जि. प. शिक्षकाने विद्यार्थ्यांसाठी सुरू केली 'रेडिओ वाहिनी.'

**आरोग्यासाठीही मार्गदर्शन**

*रेडिओ खंडाळावरून शैक्षणिक विचारांवर चर्चा, तसेच गणित , विज्ञान या विषयावर शिक्षक मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे याकरिता माहिती देण्यात येत आहे.*

**तुलसीदास खिरोडकार**

**अभ्यास करताना वेगळी मज्जा येते**

*रेडिओ खंडाळा वाहिनीमुळे नियमित शैक्षणिक कार्यक्रम ऐकायला मिळतात. सोबतच पाठ्यपुस्तकातील कविता, कथा व गीत गायन करण्याची संधी मिळाली. यामुळे अभ्यास करताना एक वेगळी मज्जा येत आहे.*

**रुपाली समाधान गव्हाळे,**

विद्यार्थिनी.

तंत्रज्ञान वापरून रेडिओच्या माध्यमातून इयत्तानिहाय सर्व विषयाचा पाठयक्रम आधारित कार्यक्रम,पाढे, कविता, शब्द, सामान्य ज्ञान व इतर प्रकारचे अध्ययन साहित्य ऑडिओ स्वरूपात विद्‍यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सहायक अध्यापक तुलसीदास खिरोडकार यांनी रेडिओ खंडाळा वाहिनी सुरू केली. शाळेतील शिक्षक, शिक्षिका व विद्‍यार्थी तसेच जिल्हाभरातील शिक्षक, शिक्षिका व विद्‍यार्थी यांच्या सहाय्याने रेडिओ

वाहिनीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवले. विद्यार्थ्यांना रेडिओ लिंकच्या माध्यमातून अध्ययन साहित्य पुरवण्यात आले. कोरोना काळात सदर उपक्रमाचा राज्यभरातील विद्यार्थ्यांना उपयोग झाला.ह्या प्रयोगाची दखल राज्याच्या शिक्षणमंत्री मा. वर्षाताई गायकवाड यांच्या सह राज्यातील सर्व अधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, मा शिक्षणाधिकारी, तसेच वर्तमानपत्र, इलेक्ट्रिक मीडिया ने घेतली.

जि. प. व. प्राथ. शाळा खंडाळा ता. तेल्हारा जि. अकोला


## फेब्रुवारी २०१९ – चित्रकोडे यशस्वी स्पर्धक

भंडारा : कु. अथर्व सलामे, रोहीणी तेलमासरे, मिनाक्षी शेंडे, अनन्या समर्थ, मंजिरी शहारे, प्रथमेश वावरे, विधाता उरकुडकर, युक्ति बावनकर, आयुष गजभे, आर्यन केरझरकर, सिमरन शेख, सोहम मोहरकर, उदय चौधरी, सांज घोडीचोर, अवनी भोपे, लितिका शहारे, अलिशा सैय्यद, वैभवी झिलपे, श्रेयशी चव्हाण, दृष्टी मानापूरे, लेखीता हटवार, स्वरा गायकवाड, प्रथम सलामे. अकोला : [illegible]. प्रणव परमाळे, आदित्य चराटे, श्याम भटकर, कृष्णा पागधुने, नियती वासनिक, सर्वेश बकाल, निर्झर बन्नोरे. पुणे : कु. गणेश परदेशी, श्वेता जाधव, नाजुका देठे, प्रथमेश उत्तर्डे, मनोज जाधव, दिगंबर गायकवाड, पवन भुसारे, कु. भैरवी करजावकर. सातारा : कु. आश्विनी खंडेराव, यश मोरे, हर्षल धुळ, पूजा जाधव, आरती खाडे, वैभव घार्गे, कु. सुवीर फडे. सांगली : कु. प्रणिता लोहार, रोशनी सातपुते. बुलडाणा : कु. ओम कुकडे, कु. हरीष गाळकर. अमरावती : कु. अश्विनी वानखडे. औरंगाबाद : कु. ज्योती तायडे, रोहन वाघ, कोमल जाधव. उस्मानाबाद : कु. वैष्णवी मुसळे. रत्नागिरी : कु. तनुजा मांजरे, वेद गोरीवले, विक्रांत शिंदे, सुजल वणे, सानिका गुरव, प्रांजल म्हस्के, ॠचा कुऱ्हेकर, कु. ऋतिक कदम, पार्थ म्हस्के, आयुष जाधव, हर्ष म्हस्के. अमरावती : कु. हरीश इंगळे. नाशिक : कु. ऋत्विज सातभाई. बीड : कु. प्रसाद मांडे, मानसी जवणे. लातूर : कु. ऐश्वर्या बरडे. कोल्हापूर : कु. आशिष पोवार, संस्कृती आंबेकर. अहमदनगर : कु. प्रतीक ठाकर, मृण्मयी चव्हाण. सिंधुदुर्ग : कु. वैदेही सारंगे, कु. सानिका दळवी, ओम करंदीकर. सोलापूर : कु. स्वाती जवळगे. नाशिक : हरिष लुकारे, कु. वरदा गायधनी. नागपूर : कु. आर्या शिनखेडे. गोंदीया : कु. उन्नती काठाणे. ठाणे : कु. गार्गी चव्हाण, भाविका गायकवाड, ऋतुजा लोणे, खुशाली लोणे, विशाखा लोणे, प्रणाली लोणे, चेतना लोणे, वैष्णवी लोणे, सानिका लोणे.

## फेब्रुवारी २०१९ : कुतूहल यशस्वी स्पर्धक

औरंगाबाद : कु. गणेश चौथे. भंडारा : कु. अथर्व सलामे, रोहींणी तेलमासरे, मिनाक्षी शेंडे, अनन्या समर्थ, मंजिरी शहारे, प्रथमेश वावरे, विधाता उरकुडकर, युक्ति बावनकर, आयुष गजभे, आर्यन केरझरकर, सिमरन शेख, उदय चौधरी, सांज घोडीचोंर, अवनी भोपे, लितिका शहारे, अलिशा सैय्यद, वैभवी झिलपे, श्रेयशी चव्हाण, दृष्टी मानापूरे, लेखीता हटवार, स्वरा गायकवाड, प्रथम सलामे. नाशिक : हरिष लुकारे. दापोली : कु. प्रणव अभ्यंकर. पुणे : कु. भैरवी करजावकर.

## चित्रकोडे मार्च २०१९ चे उत्तर




## मार्च २०१९ कुतूहल उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १-२ | ५-३ | ९-४ | १३-१ |
| २-२ | ६-३ | १०-२ | १४-४ |
| ३-३ | ७-२ | ११-१ | १५-२ |
| ४-२ | ८-१ | १२-३ | |

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे द्वारे प्रकाशित किशोर मासिकामध्ये जि. प. शाळा खंडाळा येथील विद्यार्थ्यांची चित्रकोडे अचूक सोडवल्याबद्दल नावे प्रसिद्ध.

**लोकमत**

## कोरोना काळातही विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न

# खंडाळा येथे विद्यार्थ्यांसाठी घरोघरी स्वयंअध्ययन उपक्रम

खंडाळा : कोरोनाचा ग्रामीण भागातील वाढता प्रभाव पाहता ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिक्षकांनी तयार केलेल्या स्वाध्यायमाला स्वयंअध्ययनाला चालना देणारी व शिक्षण सुरु ठेवण्यासाठी पोषक आहे, असे मत तेल्हारा पंचायत समिती सदस्य किशोर मुंदडा यांनी व्यक्त केले.

बुधवारी घरोघरी स्वयंअध्ययन उपक्रमाचा प्रारंभ करुन साप्ताहिक स्वाध्यायमाला विद्यार्थी वितरणाला प्रारंभ करण्यात आला. जिल्हा परिषद व. प्राथमिक केंद्रशाळा खंडाळा येथील शिक्षकांकडून इयत्तानिहाय व विषयानुरुप अभ्यासपूर्ण स्वाध्यायमाला तयार करण्यात आल्या आहेत. पाठ्यपुस्तकातील आशयावर आधारित स्वयंअध्ययन उपक्रमाची मांडणी असलेल्या स्वाध्यायाच्या प्रती शाळेत दाखल विद्यार्थ्यांना घरपोच वितरित करण्यात येत आहेत.



सोबतच मोहल्ला शाळा, रेडिओ खंडाळा व भिंतीवरचा अभ्यास उपक्रमाद्वारे कोरोना महामारीच्या काळात खंडाळा गावातील विद्यार्थ्यांना शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन व ऑफलाइन शिक्षण सुरु ठेवण्यासाठी, स्वाध्याय तपासणी व मार्गदर्शन करण्यास केंद्र प्रमुख गजानन गायगोळ, मुख्याध्यापक शीला टेंभरे,ओमप्रकाश निमकर्डे, श्रीकृष्ण वाकोडे, सुरेखा हागे, राजेंद्र दिवनाले, गोपाल मोहे, निखिल गिन्हे, तुलसीदास खिरोडकार यांनी पुढाकार घेतला आहे. शाळेच्या वतीने आयोजित सर्व उपक्रमांना शाळा व्यवस्थापन समिती व पालकांचे सहकार्य मिळत आहे.

Hello Akola
Page No. 3 Aug 21, 2020
Powered by: erelego.com

कोरोना काळात प्रत्यक्ष शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी स्वयंअध्ययन उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये आठवड्यातून एक दिवस अभ्यास देऊन तपासणी करण्यात आली.





# केले के कचरे से वेस्ट फॉर बेस्ट

## फूलखेती संवर्धन के लिए मिलेगा लाभ

संवाददाता | हिवरखेड़

केले की फसल से निर्माण होने वाला कचरा, छिलटे अस्ताव्यस्त बिखरने से पर्यावरण को धोखा तथा स्वास्थ्य की समस्या निर्माण होती है। इस पर उपाययोजनाए कर कचरे के उपयोग से अन्नद्रव्य निर्मिती करने का प्रोजेक्ट खंडाला शाला के छात्राओं ने भारत सरकार के विज्ञान व सूचना तकनीकी मंत्रालय को प्रस्तुत किया। उसका चयन इन्स्पायर अवार्ड के लिए हुई है। राष्ट्रीय स्तर पर इन्स्पायर अवार्ड विज्ञान प्रदर्शनी के माध्यम से वैज्ञानिक तकनीकी में शालेय विद्यार्थियों का सहभाग लेकर भारत सरकार द्वारा प्रोत्साहित किया जाता है। इस वर्ष इन्स्पायर अवार्ड विज्ञान प्रदर्शनी के लिए तेल्हारा तहसील के जिला परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाला खंडाला के कक्षा सातवीं की छात्रा ईश्वरी गजानन गोलाईत के केले के फसल पर आधारित क्लीन इंडिया, वेस्ट फॉर बेस्ट इस प्रोजेक्ट का चयन करने से खुशी व्यक्त की जा रही है। केले के कचरे से पोटैशियम निर्माण कर फूल खेती संवर्धन के लिए विशेष कर इस प्रोजेक्ट में दखल ली गई है। सतपुडा के गोद में बसे खंडाला परिसर में अधिकांश किसान केले फसल की बुआई करते है। केले की कटाई के बाद शेष वृक्ष व पत्ते, केले के छिलटो का व्यवस्थापन उचित तरीके से कर अन्नद्रव्य निर्माण कर फूलखेती व फसलों को पोषक घटक तथा स्वच्छ भारत अभियान को मदद करने के संदर्भ में प्रोजेक्ट में सूचित किया गया है। प्रोजेक्ट के निर्माण के लिए विशेष मार्गदर्शन परिसर व विज्ञान उपक्रम प्रमुख अध्यापिका सुरेखा हागे, गोपाल मोहे, निखिल गिर्हे, वर्ग शिक्षक तुलसीदास खिरोडकर ने किया है। कोरोना महामारी के दौर में भी विद्यार्थियों को सातत्य से अध्ययन रखने के लिए रेडिओ खंडाला, मोहल्ला शाला, बोलकी दीवारे, स्वाध्यायमाला, कृतिपत्रिका, परिसर व विज्ञान ऐसे विविध उपक्रम शाला के माध्यम से चलाए जा रहे है। इन्स्पायर अवार्ड के लिए प्रोजेक्ट का चयन होने से ईश्वरी का केंद्र प्रमुख गजानन गायगोल, शाला व्यवस्थापन समिति अध्यक्ष शैला खंडेराव उपाध्यक्ष प्रशांत आंबुसकर, शिक्षा तज्ञ दिनकर धुल, प्रधानाध्यापिका शीला टेंभरे, श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, राजेंद्र दिवनाले ने सराहना की। छात्रों में वैज्ञानिक जनजागृति व नवनिर्मिती के लिए विविध उपक्रम प्राकृतिक घटकों का उपयोग कर परिसर में चलाए गए।


**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकारांनी बजरंग इस्पात उद्योग अकोला चे अधिकृत भागीदारांकडुन त्यांचे मालकीचे व ताब्यातील मौजा रिधोरा ता बाळापुर जि. अकोला येथील शेत सर्वे नं. 42/1 एकुण क्षेत्रफळ 2 हे 92 आर यापैकी त्यांचे मालकीचा 0 हे 81 आर शेतजमीन ज्यास चतु:सिमा पुर्वेस श्री गोपाल श्रीराम गोयनका यांची जमीन पश्चिमेस श्री मानकर यांची शेतजमीन उत्तरेस अकोला खामगांव रोड व दक्षिणेस वसंतराव बोरकर यांची जमीन व हायवे नं. 6 चा भाग असून लवकरात लवकर खरेदी करणार आहे. तरी सदरहु मालमत्तेवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार, बोजा, गहाण किंवा इतर उजर असल्यास त्यांनी ही जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन 10 (दहा) दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर येवुन हरकत नोंदवावी असे न केल्यास आमचे पक्षकार खरेदीखत नोंदुवन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध, हरकत व इतर उजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी. दि. 7/1/2021 रोजी दिलेल्या जाहीर सुचना दुरुस्त करून पुन्हा देण्यात येत आहे.

अकोला दि. 08/01/2021

**Adv. M. V. Santani**
Radha Soami Apartment,
Opp. Hirabai Plots Ground
Adarsh Colony Akola
(M) 9850341322


जि. प. शाळा खंडाळा येथील कु. ईश्वरी गजानन गोलाईत या विद्यार्थिनीने सादर केलेल्या ' केळीच्या कचऱ्यापासून खतनिर्मिती ' या प्रतिकृतीची निवड **Inspire Award** करिता **2020 - 2021** या शैक्षणिक वर्षाकरिता करण्यात आली. यासाठी सौ. सुरेखा हागे यांनी मार्गदर्शन केले.

# ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्यातून विद्यार्थ्यांचे शिक्षण गतिमान होते : केंद्रप्रमुख गजानन गायगोळ

## खंडाळा येथे ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्य शिक्षण गतिमान होण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात असे प्रतिपादन केंद्रप्रमुख गजानन गायगोळ यांनी खंडाळा केंद्रस्तरीय ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्य प्रदर्शन प्रसंगी व्यक्त केले.

यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शीला टेंभरे,प्रमुख अतिथी म्हणून गजानन काळपांडे, कलीम सर, नितीन तराळे, सुनीता वानखडे उपस्थित होते. तेल्हारा तालुक्यातील खंडाळा केंद्र अंतर्गत येणाऱ्या शाळातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीमध्ये विविध ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्य मांडणी करून उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले.



याच कार्यक्रमात जिल्हा प्रशासनाद्वारे आयोजित कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेअंतर्गत जनजागृती मोहिमेत सहभाग घेणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

बालरक्षक म्हणून विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणणाऱ्या बालरक्षक श्रीकृष्ण भड, श्रीराम भोपळे, उमेश तिडके, अमोल राखोंडे, प्रमोद दाते, ओमप्रकाश पांडव, तुलसीदास खिरोडकार यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शैक्षणिक संशोधन परिषद पुणे कडून प्राप्त सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

आयोजित प्रदर्शनीमध्ये खंडाळा केंद्रातील विजय ढोकणे, देविदास कोहरे, दीपक पोके, प्रवीण चोपडे, संजय गासे, श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, राजेंद्र दिवनाले,प्रमोद रेखाते, संतोष गावंडे, शारिक अली, मो. अन्सार यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन उपक्रमशील शिक्षक गोपाल मोहे तर आभार प्रदर्शन निखिल गिऱ्हे यांनी केले.

जि. प. केंद्र शाळा खंडाळा येथे ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन भरवण्यात आले.





**लोकमत**

खंडाळा जिल्हा परिषद शाळेने उघडले ज्ञानाहार रेस्टॉरंट

# जेवण व नाश्ता समजून विद्यार्थी करतात अभ्यास!

**पॉझिटिव्ह स्टोरी**



लोकमत न्यूज नेटवर्क

**खंडाळा :** कोरोना संसर्गाच्या भीतीमुळे राज्यातील प्राथमिक शिक्षण संस्था बंद आहेत. विद्यार्थी अध्ययनरत राहावेत. म्हणून तेल्हारा तालुक्यातील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा खंडाळाने विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाहार रेस्टॉरंट सुरू केले आहे. या उपक्रमामुळे खंडाळा येथील विद्यार्थ्यांना घराजवळ शिक्षण सुविधा उपलब्ध झाली आहे.

शाळा बंद असल्याने ऑफलाइन शिक्षण देण्यासाठी येणारे अडथळे दूर करण्यासाठी स्थानिक शिक्षकांनी रेस्टॉरंटमध्ये खाद्यपदार्थ खाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या द्रोण, पत्रावळी, कागदी प्लेट वर इयत्ता एक ते सातच्या अभ्यासाचे लेखन करून विद्यार्थ्यांना अभ्यास जेवण व नाश्ता रूपात उपलब्ध करून दिला आहे.

पुस्तकातील आशय, स्वाध्याय पत्रावळीवर लेखन करून खंडाळा येथील शिक्षकांनी वेगळ्या पद्धतीने अभ्यासाची आवड विद्यार्थ्यांत ज्ञानाहार रेस्टॉरंट उपक्रमातून निर्माण केली आहे. ग्रामीण भागात ऑनलाइन शिक्षणात असंख्य अडथळे येत आहेत. त्यावर मात करण्यासाठी शाळेच्या वतीने आतापर्यंत रेडिओ खंडाळा, स्वाध्यायमाला, निसर्गयात्रा, ऑनलाइन टेस्ट, मोहल्ला शाळा असे उपक्रम शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने राबविले. ज्ञानाहार रेस्टॉरंट तयार करण्यासाठी शिक्षण तज्ज्ञ सदस्य दिनकर धूळ यांनी जागा उपलब्ध करून दिली. तेथून विद्यार्थी ज्ञानाहार घेऊन घरी अभ्यास करतात.

> नियमित शिकण्याच्या साहित्यासोबत वेगळी शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्यास ते आनंदाने अभ्यास करतात. या अनुभवातून ज्ञानाहार रेस्टॉरंट सुरू केले. त्याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.
>
> **- तुलसीदास खिरोडकार**
> प्रयोगशील शिक्षक, खंडाळा

गणितीय क्रिया, भाषा व्याकरण, इंग्रजी, विज्ञान, भौगोलिक माहिती, इतिहास विषयासंबंधी सोप्याकडून कठिणाकडे जाणाऱ्या स्वाध्याय कृती ज्ञानाहार रेस्टॉरंटमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासह अभ्यासपूरक वाचनीय पुस्तके येथे ठेवण्यात आली आहेत. ज्याचा उपयोग गृहकार्य करण्यासाठी विद्यार्थी आवडीने करीत आहेत.

कोविड संसर्ग नियम लक्षात घेऊन केंद्रप्रमुख गजानन गायगोळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शैला खंडेराव, उपाध्यक्ष प्रशांत आंबूसकर, शिक्षणतज्ज्ञ दिनकर धूळ, सदस्य संतोष वैतकार यांच्या सहकार्याने गावातील विद्यार्थी आनंदाने अध्ययनरत राहावे यासाठी ज्ञानरचनावादी पद्धतीने सुरू केलेल्या ज्ञानाहार रेस्टॉरंट उपक्रमाबद्दल मुख्याध्यापिका शीला टेंभरे, श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, तुलसीदास खिरोडकार, राजेंद्र दिवनाले, सुरेखा हागे, गोपाल मोहे, निखिल गिऱ्हे यांचे शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी कौतुक केले आहे.

Hello Akola Gramin
Page No. 1 Aug 28, 2021
Powered by: erelego.com

# ज्ञानाहार रेस्टॉरंट - जि. प. शाळा खंडाळा

लोकमत

संसर्गजन्य कोरोनाच्या भीतीने घरातच कोंडून ठेवलेल्या लहानग्या जिवांच्या प्रदीर्घ अशा काळानंतर शाळा सुरू झाल्या आणि शालेय सहवासात प्रत्येक चेहरा आनंदाने फुलून गेला. कोरोनाची भीती न बाळगता सावधगिरी बाळगत शाळेची घंटा एकदाची वाजली. अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेला आनंदाने सुरुवात झाली. पाठ्यपुस्तकातील अनेक घटकांना कमी करण्यात आले. अध्ययनाचे तास सुद्धा कमी झाले. यावर उपाय म्हणून पाठ्य घटकांशी समन्वय साधणारी एक दिवसीय निसर्गयात्रा जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा खंडाळा तालुका तेल्हाराच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली.

# पाठ्य घटकांशी समन्वय साधणारी कोरोना काळातील निसर्गयात्रा





शिक्षण म्हणजे जे माहीत नाही ते माहित होणं, व्यवहारात गरज पडेल तेव्हा माहित झालेल्याचा योग्य वापर करता येणं. योग्य वापर करण्यासाठी ते आठवणं आणि शक्य असल्यास माहिती झालेल्यात काही अधिकची भर घालणं यालाच आपण शिक्षण म्हणतो. अध्ययन प्रक्रिया चिरकाल टिकणारी व्हावी, यासाठी वातावरण निर्मिती करणे आवश्यक असते. अध्ययनातून आनंद मिळायला हवा, शिक्षण ही एक खरंच आनंददायी घटना व्हायला पाहिजे. या हेतूने विद्यार्थ्यांसाठी आयोजित पाठ्य घटकाशी समन्वय साधणारी निसर्गयात्रा आनंददायी अध्ययन अध्यापनाची स्रोत ठरली.

भाषा, गणित,परिसर अभ्यास व विज्ञान, भूगोल या इयत्ता पाचवी ते सातवीच्या पाठ्यपुस्तकातील घटकांचा निसर्गाशी समन्वय साधणाऱ्या आशयाला एकत्रित करून निसर्ग यात्रेत अध्यापन करण्याचे नियोजन करण्यात आले. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील पाठातील निसर्ग घटक, निसर्ग संबंधित काव्य, परिसर अभ्यास व विज्ञान यातील निसर्गाची ओळख, पानाफुलांच्या सोबतीने गणितीय संबोध, भौगोलिक परिस्थिती इत्यादी घटकांना एकत्रित करत सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी खंडाळा शाळेपासून दोन किलोमीटर अंतरावरील शेत शिवारात, निसर्गाच्या कुशीत विद्यार्थ्यांची शाळा भरवण्यात आली.

'निसर्ग माझा'मी निसर्गा'चा हा संस्कार

विद्यार्थ्यांवर व्हावा, निसर्गाचं औदार्य आणि सौंदर्य विद्यार्थ्यांना उमजावं या हेतूने निसर्गयात्रा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होत हिरव्यागार निसर्गाचे पुस्तक वाचन करत प्रत्यक्ष अनुभूतीतून शिक्षण घेतले. सध्याच्या काळात शालेय वातावरणात शिक्षण सुविधा पुरवणे कठीण आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक भूक कुटुंबातच पालकांनी भागवायला पाहिजे. बालकांच्या जिज्ञासा विषय प्रश्नांना पाठ्यपुस्तकांचा आधार देऊन घरातच उपलब्ध साधनसामग्री च्या माध्यमातून शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवणे आजच्या काळाची गरज बनली आहे.

पाठ्यपुस्तकातील अनेक संबोध एक दिवसीय निसर्गयात्रेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे दृढ करण्यामध्ये यशस्विता मिळाली. कोरोना च्या संकटामुळे प्रत्यक्ष शिक्षणाला मिळालेला कमी वेळ या उपक्रमाच्या माध्यमातून भरून काढता आला. अनौपचारिक पद्धतीने शिक्षण मिळाल्याने विद्यार्थी आनंदाने उपक्रमात सहभागी झाले. निसर्गयात्रा या उपक्रमाला पाठ्यपुस्तकांचा आधार असला तरी एक दिवसीय यात्रेत आनंददायी अनौपचारिक पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकता आले. शेती व शेतकऱ्यांची जगण्याची पद्धत त्यांच्या श्रमाचे मोल विद्यार्थ्यांना कळले. यातूनच श्रमप्रतिष्ठा या मूल्यांची रुजवणूक सुद्धा करता आली. कमी वेळेत अनेक विषयांची सांगड घालत निसर्गयात्रा आनंदात पार पडली. निसर्ग यात्रेतून पाठ्यपुस्तकातील विविध विषयांचा सुमारे २० टक्के पाठ्यांश विद्यार्थ्यांना एकाच दिवशी सहज अध्ययन करता आला.

एक दिवशीय निसर्ग यात्रेतून विविध पाठ्यघटकांचा समन्वय साधून अध्ययन अध्यापन प्रक्रिया पूर्ण करता आली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानाची अनुभूती मिळाली. मानवी जीवनाच्या प्रगतीत निसर्गाचे योगदान समजून घेता आले.कमी वेळेमध्ये अनेक विषयांचे विद्यार्थ्यांचे शिक्षण झाले. श्रम प्रतिष्ठा ह्या मुल्याची रुजवणूक करता आली. शुद्ध वातावरणात चिरकाल टिकणारे अध्ययन झाले. मानवी जगण्याला सर्वोच्च योगदान निसर्गाचेच आहे. याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. भौगोलिक परिस्थितीनुसार पिकांची लागवड केली जाते हे समजले. निसर्ग कविता गायनातून गायन कौशल्य असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध लागला. निसर्ग यात्रेत पायीच फिरावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांचा नकळत व्यायाम झाला.

तुलसीदास खिरोडकार,
सहायक अध्यापक
जि. प. शाळा, खंडाळा, ता. तेल्हारा

Akola Main
Page No. 8 Jun 06, 2021
Powered by: erelego.com

भाषा, गणित,परिसर अभ्यास, विज्ञान व भूगोल या इयत्ता पाचवी ते सातवीच्या पाठ्यपुस्तकातील घटकांचा निसर्गाशी समन्वय साधणाऱ्या आशयाला एकत्रित करून निसर्गयात्रा उपक्रम चे नियोजन करण्यात आले. कमी काळात विविध विषयाचा समवाय साधून निसर्ग सानिध्यात प्रत्यक्ष अनुभूती देऊन अध्यापन करण्यात येते.

ह्या उपक्रमाची जीवन शिक्षण मासिक तसेच दै. लोकमत ने मंथन पुरवणीत विशेष लेख प्रसिद्ध केला.


जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा खंडाळा
पं.स.तेल्हारा.
क्रीडा संकुल
जि.प.अकोला.



लोकमत


## खंडाळा; विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगणाची निर्मिती

**खंडाळा :** येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळेला संतोष गाडोदिया यांनी दान दिलेल्या जागेवर विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगणाची निर्मिती करण्यात येत आहे. या जागेला तारेचे कुंपण करण्यात आले असून, लवकरच विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण सज्ज होणार आहे.

Hello Akola Gramin
Page No. 2 Jan 06, 2021
Powered by: erelego.com

क्रीडा संकुल - जि. प. शाळा खंडाळा

कोरोना काळात क्रीडा संकुल उभारण्यात आले.


Let's Celebrate Golden Jubilee
साजरा करूया
५०
वा भाग
शाळे
बाहेरची
शाळा
थोडी मस्ती थोडा अभ्यास।
Pratham
Every Child in School and Learning Well



विद्या प्राधिकरण पुणे, प्रथम संस्था व नागपूर आकाशवाणी निर्मित ' शाळा बाहेरची शाळा ' या राज्यस्तरीय उपक्रमात जि. प. वरिष्ठ प्राथमिक शाळा खंडाळा येथील इयत्ता चौथीचा विद्यार्थी प्रज्वल महेश जाधव या विद्यार्थ्यांचा व त्याची आई सौ. विद्या महेश जाधव यांचा संवाद जुलै **2020** च्या कार्यक्रमात नागपूर आकाशवाणी वरून प्रसारित करण्यात आला. यामध्ये त्याने कोरोना काळातील अभ्यासासंबंधी संवाद साधला.





# छात्राओं ने साकार की महान हस्तियों की व्यक्तिरेखा

संवाददाता | शिरसोड

संपूर्ण देश में अपने कार्य कर्तृत्व से अजरामर हुए व प्रेरणादायी महान माताओं को शाला विश्व महिला दिन के उपलक्ष्य में खंडाला में लगी। शिक्षा, संस्कृति, राजनीति, सामाजिक, धार्मिक क्षेत्र में उत्कृष्ट कार्य करने वाली राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होलकर, प्रतिभाताई पाटील, रमाई, भीमाई, इंदिरा गांधी, लता मंगेशकर, सिंधूताई सपकाल समेत महान व्यक्तित्व की व्यक्तिरेखा छात्राओं ने साकार की। महान माताओं ने उनके जीने की राह उपस्थित छात्रों के सामने रखी।

व्यक्तिरेखा साकार करने वाली छात्राओं को वरिष्ठ लेखिका प्रतिमा इंगोले की कविता 'माऊली व ऐसा कैसा किसान' का पोस्टर प्रधानाध्यापिका शीला टेंभरे, वरिष्ठ शिक्षक श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकाडे, तुलसीदास खिरोडकार, राजेंद्र दिक्काले के हाथों भेंट देकर सराहना की गई। कार्यक्रम का प्रास्ताविक गोपाल मोहे, संचालन सुरेखा हागे ने तथा आभार प्रदर्शन निखिल गिरे ने किया।

जागतिक महिला दिन - वेशभूषा स्पर्धा

**8** मार्च **2022** ला जागतिक महिला दिनानिमित्त विदयार्थ्यांनी महापुरुषांची वेशभूषा साकारली.

दैनिक भास्कर
BhaskarHindi.com

3/4

# पुणे के दल ने लिया जिप शाला का जायजा



संवाददाता | हिवरखेड़

कोरोना संक्रमण बीमारी के दौर में विविध शैक्षिक उपक्रम चलाकर शिक्षा जारी रखकर संघर्ष करने वाले तेल्हारा तहसील की जिला परिषद वरिष्ठ प्राथमिक शाला खंडाला में पुणे के दल ने भेंट देकर उपक्रम की जानकारी हासिल की है। रेडिओ खंडाला, मोहल्ला शाला, बोलकी दिवारे, आनलाइन टेस्ट, स्वाध्यायमाला निर्माण, कृति पत्रिका वितरण,वाट्स एप समूह, एसएमएस अध्ययन आदि अनेक उपक्रम चलाकर शिक्षकों ने विद्यार्थियों को शिक्षा उपलब्ध करवाई थी। उपक्रम चलाते निर्माण होने वाली समस्या, आवाहनो को किस तरह से हल किया इसकी जानकारी डायट अकोला व एलएफई पुणे की संस्था के दल सदस्यों ने जानकारी प्राप्त की। उक्त दल में प्रतीक भांडारकर, निवृत्ति राऊत, राजू कुरेशी, किशोर कोल्हे सहभागी हुए थे। शिक्षक, अभिभावक व विद्यार्थी उनके साथ गुट बनाए व संवाद साधकर चर्चा की गई। उपक्रमों की उपयुक्तता, सफलता, बीच में आने वाला संकट व आवाहनो पर की गई मात इस बारे में सर्वेक्षण किया गया। शाला के प्रयोगशील शिक्षक तुलसीदास खिरोडकर की संकल्पना से रेडिओ खंडाला इस उपक्रम के माध्यम से केवल खंडाला के छात्रों तक नहीं पूरे महाराष्ट्र के छात्रों को शिक्षा सुविधा उपलब्ध कराई गई थी। कोरोना काल में विविध उपक्रम चलाकर शिक्षा प्रक्रिया जारी रखने से दल के सदस्यों ने केंद्र प्रमुख गजानन गायगोल, प्रधानाध्यापिका शीला टेंभरे, अध्यापक श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, सुरेखा हागे, राजेंद्र दिवनाले, गोपाल मोहे, निखिल गिर्हे, तुलसीदास खिरोडकर की सराहना की। इस अवसर शाला व्यवस्थापन समिति अध्यक्ष शैला खंडेराव, उपाध्यक्ष प्रशांत आंबुसकर, शिक्षा विशेषज्ञ दिनकर धूल, अभिभावक प्रतिनिधि विद्या जाधव, युवराज खंडेराव उपस्थित थे।

कोरोना काळात शाळेच्या वतीने राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करण्याकरता पुणे येथील LFE ही संस्था व डाएटच्या वतीने पाहणी करण्यात आली. यावेळी अधिकाऱ्यांनी उपक्रमांची माहिती घेतली.

# राज्यस्तरीय उपक्रम में शामिल छात्रों का गौरव

**▪ 'चाचा नेहरू को पत्रलेखन' आनलाइन उपक्रम**

संवाददाता | हिवरखेड



देश के प्रथम प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू जयंती पर 14 नवंबर को बालक दिन मनाया जाता है। इस उपलक्ष्य में राज्य शैक्षिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे की ओर से बालकों के सुप्त गुणों का विकास करने के लिए चाचा नेहरू को पत्रलेखन उपक्रम आनलाइन चलाया गया था। उक्त राज्यस्तरीय उपक्रम में सहभागी छात्रों का परिषद की ओर से प्रमाणपत्र देकर गौरव किया गया। जिला परिषद वरिष्ठ प्राथमिक शाला खंडाला की पायल युवराज खंडेराव कक्षा पांचवी व शुभाशिष दिनेश खंडेराव कक्षा चौथी इन दो छात्रों ने चाचा नेहरू को पत्र इस राज्यस्तरीय पत्रलेखन उपक्रम में सहभाग लिया था। उपक्रम में छात्रों ने लिखा पत्र फेसबुक पर अपलोड कर छात्रों का नाम पंजीयन राज्य शैक्षिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे की ओर आनलाइन किया था। राज्यस्तरीय पत्रलेखन उपक्रम में पायल व शुभाशिष को शासन की ओर से सहभाग प्रमाणपत्र आनलाइन प्रदान किया गया। बालक दिन सप्ताह में केंद्र प्रमुख गजानन गायगोल, प्रधानाध्यापिका शीला टेंभरे, श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, तुलसीदास खिरोडकर, सुरेखा हागे, राजेंद्र दिवनाले, गोपाल मोहे, निखिल गिर्हे ने छात्रों को मार्गदर्शन किया। राज्यस्तरीय उपक्रम में शामिल दोनो छात्रों की सभी ओर से सराहना हो रही है।

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

## सहभाग प्रमाणपत्र

कुमार/कुमारी KHANDERAO SHUBHASHISH DINESH इयत्ता IV

याने/हिने 'बालदिवस सप्ताह' कार्यक्रमांतर्गत '**पत्रलेखन**' या उपक्रमात

'**इयत्ता ३ री ते ५ वी**' या गटातून सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान केले जात आहे.

**विकास गरड**
प्र. प्राचार्य (समन्वय)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

2013393

**दिनकर पाटील**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

27050702401 AKOLA TELHARA

E-Certificate downloaded from http://scertmaha.ac.in



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सहभाग प्रमाणपत्र

कुमार/कुमारी KHANDERAO PAYAL YUVARAJ इयत्ता V

याने/हिने 'बालदिवस सप्ताह' कार्यक्रमांतर्गत '**पत्रलेखन**' या उपक्रमात

'**इयत्ता ३ री ते ५ वी**' या गटातून सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान केले जात आहे.

2012617

विकास गरड
प्र. प्राचार्य (समन्वय)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

दिनकर पाटील
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

27050702401 AKOLA TELHARA

E-Certificate downloaded from http://scertmaha.ac.in

बालदिनानिमित्त चाचा नेहरूंस पत्र या राज्यस्तरीय स्पर्धेत विदयार्थ्यांचा सहभाग.




तंबाखूजन्य पदार्थांची होळी



अकोला जिला

अकोला, सोमवार, 5 अक्टूबर 2020 13

पहल | बालरक्षक की पहल से शाला बाहर के छात्र हो रहे शिक्षित

# आदिवासी बारेला परिवार की पहली पीढ़ी शिक्षा के प्रवाह में

संवाददाता | हिवरखेड

भूखे पेट के लिए दो कौर मिले इसके लिए रोजगार की तलाश में घुमनेवालों को शिक्षा और शाला की जरूरत या कहें की अहसास कभी हुआ ही नहीं। इन आदिवासी परिवारों की कई पीढ़ी को शिक्षा का महत्व या जरूरत ही नहीं महसुस हुई। परंतु आज के बदलते परिवेश के साथ ही परिवर्तन के नियमों को देखते हुए ऐसे आदिवासी बारेला परिवार की पहली पीढ़ी तहसील बालरक्षक तुलसीदास खिरोड़कर की पहल से आद शिक्षा के प्रवाह से जुड़ गई है।

## सभी ने दिया सहयोग

शाला प्रवेश पर 'सेव बचपन' संस्था के समसद केंद्र प्रमुख गजानन गायगोल, उमेश तिडके, विखिल मिन्हे आदि की ओर से प्राप्त शालेय गणवेश, बालमित्र अक्षर पहचान पुस्तिका, स्कूल बैग, लेखन, पट्टी आदि दी गई। इस अवसर पर सलाम मुंबई फाउंडेशन जिला समन्वयक अंबादास वाडलाव, मुख्याध्यापिका शीला टोमरे, शिक्षक तह दिनकर धुल की उपस्थिति में छात्रों को दाखिले के अवसर पर भेंट दी गई। अध्यापक गोपाल मोहे, सुरेखा हागे, विखिल मिन्हे, बालरक्षक तुलसीदास खिरोड़कर, श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश बिमकाडे, राजेंद्र दिवनाले, पालक मोहन बारेला, संगीता बारेला, अमरसिंह बारेला आदि की उपस्थिति रही।

मध्यप्रदेश के खंडवा जिले के सिंगी मोड के गांव से रोजगार के लिए स्थलांतर कर तेल्हारा तहसील के खंडाला परिसर में रुके मोहन बारेला व अमरसिंह बारेला के परिवार के आकाश व रंगीता के रूप में इस समाज की या परिवार की पहली पीढ़ी ने शिक्षा के लिए पहला कदम बढ़ाया और किताबों से मित्रता करते हुए निरक्षरता के लगे दाग को धोने के लिए कदम बढ़ाया है। समता विभाग महाराष्ट्र शासन के मार्गदर्शन में तेल्हारा तहसील के बालरक्षक के रूप में कार्य करनेवाले तुलसीदास खिरोडकर शाला के बाहर रहनेवाले बच्चों की तलाश करते समय इन बच्चों पर उनका ध्यान गया। खिरोडकार व सहयोगी शिक्षकों ने अभिभावकों को शिक्षा के महत्व से अवगत करवाकर जिला परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाला खंडाला में आयु के अनुसार उनका दाखिला करवाया।

## शाला बाह्य छात्रों को मुख्य प्रवाह में लाना जरूरी है

कोरोना से गांव वापस गए अनेक परिवार रोजगार की तलाश में भटक रहे है। परिवार के साथ चल रहे ऐसे ही बारेला परिवार ने तेल्हारा में अपना रोजगार तलाशा। परिवार के बच्चों को शाला में प्रवेश देने के लिए और शिक्षा के महत्व को ऐसे ही परिवारों को समझाकर आज के शिक्षा के प्रवाह में लाने का कार्य मेरे जैसे बालरक्षक कर रहे है। इस पहल से अनेक परिवारों के बच्चों को आज शिक्षा के कारण अपना कार्य करने में आसानी हो रही है और साथ ही अनेक जानकारियां प्राप्त होकर वे आज के दौर में आगे बढ़ रहे है।

**तुलसीदास खिरोड़कर**, बालरक्षक तेल्हारा

राज्यपाल से पातर का | शिवकुमार | बालापुर तहसील में फसल की

बालरक्षक तुलसीदास खिरोडकार बालरक्षक चळवळीच्या माध्यमातून शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करून शिक्षणाच्या प्रवाहात कार्य करत आहेत.

दैनिक भास्कर
BhaskarHindi.com
3/4

# खंडाला में माता अभिभावकों का सत्कार

## ▪ सावित्रीबाई फुले पुण्यतिथि मनाई

संवाददाता | हिवरखेड



कोरोना काल में शैक्षिक प्रक्रिया तेज करने के लिए शाला व समाज एकत्रित आने की आवश्यकता है। हर घर में शाला लगनी चाहिए ऐसा प्रतिपादन प्रेरक माता विद्या जाधव ने व्यक्त किया। परिवार व समाज के छात्रों को शैक्षिक प्रेरणा देने वाली माता अभिभावकों का खंडाला में क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले पुण्यतिथि पर सत्कार किया गया। कार्यक्रम में सत्कार मूर्ति के रूप में सौ. जाधव बोल रही थी। कोरोना की पृष्ठभूमि पर शैक्षिक संस्था बंद है। विद्यार्थी घर में बैठकर अध्ययन कर रहे है। गांव के सभी विद्यार्थी इस दौर में खुशी से पढ़े लिखे इसके लिए शाला को सहयोग करने वाली शिक्षा प्रेरक माता अभिभावकों का सत्कार विश्व महिला दिन व सावित्रीबाई फुले पुण्यतिथि उपलक्ष्य में जिप वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाला खंडाला में लिया गया। शिक्षा प्रेरक माता के रूप में शाला व्यवस्थापन समिति की अध्यक्षा शैला युवराज खंडेराव, सदस्य लक्ष्मीबाई दिनकर धुल, नंदा परमाले, आंगनवाडी सेविका वैशाली अरूण तायडे, माता अभिभावक विद्या महेश जाधव, रेश्मा अनंता पिलांत्रे का शैक्षिक सामग्री व भाषण संग्रह पुस्तिका भेंट देकर प्रधानाध्यापिका शीला टेंभरे व मान्यवरों के हाथों सत्कार किया गया। शाला की ओर से कोरोना काल में चलाए उपक्रम जैसे की मोहल्ला शाला, बोलती दीवारे, स्वयं अध्ययन, स्वाध्यायमाला, आनलाइन टेस्ट, रेडिओ खंडाला उपक्रम के माध्यम से विद्यार्थी शिक्षा के लिए अगुवाई ली गई। विविध शैक्षिक उपक्रमों के अमल के बारे में माता अभिभावकों ने शिक्षकों का आभार व्यक्त किया। सत्कार समारोह में दिनकर धुल, श्रीकृष्ण वाकोडे, राजेंद्र दिवनाले उपस्थित थे। कार्यक्रम का प्रास्ताविक अध्यापक तुलसीदास खिरोडकर, संचालन निखील गिर्हे, आभार प्रदर्शन गोपाल मोहे ने किया। कार्यक्रम का व्यवस्थापन कोविड के नियमों का पालन कर महाराणा प्रताप स्काउट दल तथा राजू मीना मंच सदस्य छात्रों ने किया।

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या पत्रानुसार महिला दिनानिमित्त 8 मार्च 2020 रोजी जि. प. व. प्राथमिक शाळा खंडाळा येथे शिक्षण प्रेरक माता सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यामध्ये कोविड काळात मोहल्ला शाळा व इतर शालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थी

अध्ययनरत राहावा यासाठी सहकार्य करणाऱ्या माता पालकांचा सन्मान करण्यात आला.




तंत्रज्ञानाचा वापर करून जिल्हा परिषद शाळा खंडाळा या नावाने शैक्षणिक ब्लॉगची निर्मिती केली असून यामध्ये शाळेतील व केंद्रातील सर्व उपक्रमांची माहिती संग्रहित आहे.

**Blog Link - [Click Here]**

Scanned with CamScanner



# 'मी शिक्षण मित्र' उपक्रम

खंडाळा : शाळाबाह्य व शिक्षणात कमकुवत मुलांना शैक्षणिक हातभार लावण्यासाठी 'मी शिक्षण मित्र' या उपक्रमाचा प्रारंभ वृक्षमित्र षण्मुगानाथन यांच्या हस्ते पोस्टर प्रकाशित करून जि.प. व. प्राथमिक शाळा खंडाळा येथे करण्यात आला.

समाजातील प्रत्येक घटक शिक्षित व्हावा, यासाठी आयुष्य व्यतीत केलेले थोर समाजसुधारक महात्मा फुले यांना शाळेच्यावतीने विद्यार्थी व शिक्षकांनी शिक्षण मित्र बनून आदरांजली वाहिली. यावेळी षण्मुगानाथन यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रत्येकास वर्षभरात एक वृक्ष संगोपन करण्याचे आवाहन करून शिक्षण मित्र बनत आपल्या सोबत्याला शैक्षणिक गुणवंत करण्याची शपथ दिली. उपक्रमाची निर्मिती केंद्रप्रमुख गजानन गायगोळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, संयोजन निखिल गिऱ्हे करणार आहेत. आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शीला टेंभरे होत्या तर मंचावर ज्येष्ठ शिक्षक श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, राजेंद्र दिवनाले, तुलसीदास खिरोडकार यांची उपस्थिती होती. संचालन सुरेखा हागे तर आभार गोपाल मोहे यांनी मानले. (वार्ताहर)

Scanned with CamScanner



जि. प. शाळा खंडाळा येथे ' मी शिक्षण मित्र ' उपक्रम राबविण्यात आला.

# स्वाध्यायासाठी लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला

## जि. प. शाळा खंडाळाचा उपक्रम : 'व्हर्च्युअल' स्कूलची अनुभूती

लोकमत न्यूज नेटवर्क

खंडाळा : पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय लेखकांच्या पद्धतीने सोडवित साहित्य वाचन नि साहित्य जगणे विद्यार्थ्यांना कळावे, या हेतूने तेल्हारा तालुक्यातील जि. प. व. प्राथमिक शाळा खंडाळा येथे लेखक आपल्या भेटीला हा उपक्रम राबविण्यात येतो. तंत्रज्ञानाचा वापर करीत व्हॉट्सअ‍ॅप व्हिडिओ कॉलिंगद्वारे वऱ्हाडी कादंबरीकार स्तंभलेखक पुष्पराज गावंडे यांनी विद्यार्थ्यांसोबत वऱ्हाडी बोलीभाषा व त्याचा रसास्वाद याबाबत गप्पा मारल्या व विद्यार्थ्यांना व्हर्च्युअल स्कूलची अनुभूती दिली.

शाळेच्यावतीने अध्ययन, अध्यापन प्रक्रिया जिवंत व चिरकाल टिकणारी होण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान दररोज वापरल्या जाते. इयत्ता सहावीतील मराठी पुस्तकात पुरुषोत्तम बोरकर यांच्या 'मेड इन इंडिया' कादंबरीतील उतारा बोलीभाषेतील स्वाध्याय सोडविण्यासाठी आहे. यासोबतच गुल्लेरकार नरेंद्र इंगळे व कादंबरीकार पुष्पराज गावंडे यांच्या वऱ्हाडी साहित्याचा स्वाध्याय वर्गशिक्षक तुलसीदास खिरोडकार यांनी देऊन प्रत्यक्ष वऱ्हाडी बोलीभाषा लेखक पुष्पराज गावंडे यांच्याशी गप्पा मारण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी आनंदित झाले.

केंद्रप्रमुख गजानन गायगोळ यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविल्या जात असून, लेखक व कवी मित्रांसोबत प्रत्यक्ष भेटीला येण्याचे निमंत्रण शाळेच्यावतीने गावंडे यांना देण्यात आले. यावेळी विद्यार्थी, वर्गशिक्षक तुलसीदास खिरोडकार, मुख्याध्यापक शीला टेंभरे, निखिल गिऱ्हे, श्रीकृष्ण वाकोडे ओमप्रकाश निमकर्डे, सुरेखा हागे यांनी वऱ्हाडी बोलीतून लेखक महोदय यांच्याशी गप्पा मारल्या.

आपली वऱ्हाडी बोली आपण नियमित व्यवहारात बिनदिक्कत वापरावी, साहित्य वाचन करावे, तसेच आपले अनुभव बोलीभाषेत लिहिण्याचा सराव करावा, अमरावती येथे होणाऱ्या वऱ्हाडी साहित्य संमेलनात येण्याचे निमंत्रणही कादंबरीकार पुष्पराज गावंडे यांनी गप्पा मारताना दिले.

Hello Akola
Page No. 2 Dec 08, 2019
Powered by: erelego.com

तंत्रज्ञानाचा वापर करून व्हिडिओ कॉलिंग करून पाठ्यपुस्तकातील लेखकांशी विद्यार्थ्यांचा संवाद साधण्यात आला.

# शालाबाह्य बच्चों के हाथ में थमाई कलम



**शिक्षाधिकारी वैशाली ठग की उपस्थिति में राहुल, चांदनी का शाला प्रवेश**

**संवाददाता** | हिवरखेड़.

रोजगार के लिए स्थलांतरित माता-पिता के पीछे खेत में उछल-कूद कर बचपन गुजारने वाले राहुल व चांदनी नामक बच्चों के हाथ में कलम आने से उनके जीवन में शिक्षा श्री गणेश हुआ है। अमरावती जिले से रोजगार की तलाश में ग्राम खंडाला के खेत परिसर में अनेक परिवार आते हैं।

इसमें एक दादू जांभेकर के बच्चे राहुल व चांदणी को जिप प्राथमिक शाला खंडाला में प्रवेश दिया गया।इस अवसर पर प्राथमिक शिक्षाधिकारी वैशाली ठग ने अभिभावक व विद्यार्थियों का स्वागत किया। शालेय गणवेश, शैक्षिक सामग्री देकर उन्हें शाला प्रवेशित किया। इस सत्र में शाला में बाल रक्षक व सेव बचपन के जिला समन्वयक तुलसीदास खिरोडकर व सहयोगी शिक्षकों ने पहल कर दस शालाबाह्य बच्चों को उनकी आयु अनुसार शाला में प्रवेश देकर उन्हें शिक्षा के प्रवाह में लाया है। इस अवसर पर शिक्षाधिकारी वैशाली ठग, नितिन सुदालकर, जिला समन्वयक प्रशांत अंभोरे, गुट शिक्षाधिकारी दिनेश दुतंडे ने केंद्र शाला खंडाला की पड़ताल कर शालेय कामकाज, गुणवत्तापूर्ण शिक्षा प्रणाली की प्रशंसा की। इस समय शाला व्यवस्थापन समिति सदस्य दिनकर धूल, संतोष वैतकार, सेव बचपन के विनोद राठोड, सचिन वावरकर, केंद्र प्रमुख गजानन गायगोल, प्रधानाध्यापक शीला टेंभरे, श्रीकृष्ण वाकोडे, ओमप्रकाश निमकर्डे, सुरेश हागे, राजेंद्र दिवनाले, गोपाल मोहे, निखिल गिर्हे, कपिल इंगले उपस्थित थी।

शिक्षणाधिकारी प्राथमिक मा. डॉ. वैशाली ठग यांच्या उपस्थितीत शाळाबाह्य मुलांना प्रवेश देण्यात आला.

प्रेरणास्थान

मा. सौरभ कटियार  मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अकोला

मा. डॉ. ज्ञानेश्वर नागरे  प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अकोला

मा. डॉ. वैशाली ठग  शिक्षणाधिकारी प्राथमिक जि. प. अकोला

मार्गदर्शक

मा. भरतसिंग चव्हाण  गटविकास अधिकारी पं. स. तेल्हारा

मा. प्रदीप चोरे  गटशिक्षणाधिकारी पं. स. तेल्हारा

मा. दिनेश दुतंडे  शिक्षण विस्तार अधिकारी पं. स. तेल्हारा

मा. गजानन गायगोळ  केंद्रप्रमुख खंडाळा



# सहकारी शिक्षक वृंद

जि. प. व. प्राथ. केंद्र शाळा खंडाळा पं. स. तेल्हारा जि. प. अकोला

सौ. शीला विनोदराव टेंभरे मुख्याध्यापक
श्रीकृष्ण तानुजी वाकोडे स. अ.
ओमप्रकाश शालिकराम निमकर्डे स. अ.
तुलसीदास किसनराव खिरोडकार स. अ.
सौ. सुरेखा ब्रम्हदेव हागे स. अ.
राजेंद्र दयारामजी दिवनाले स. अ.
गोपाल बाळकृष्ण मोहे स. अ.
निखिल सुरेशराव गिऱ्हे स. अ.

---